**महाराष्ट्र शासन**

Email ID: girish.bhalerao@nic.in
Phone No.: (022) 2201 7103

क्र. संकीर्ण २०१९/ प्र.क्र.२४१/ भाग-१/ आस्था८
ग्राम विकास व पंचायत राज विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक: १६ एप्रिल, २०१९.

प्रति,

व्यवस्थापक,
महाआयटी, परीक्षा कक्ष,
सातवा मजला (मुख्य), मंत्रालय,
मुंबई. ४०० ०३२.

**विषय: पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज मागविणेबाबत मुदतवाढ.**
**संदर्भ: शासनपत्र समक्रमांक दिनांक ०१/०३/२०१९**

महोदय,

जिल्हा परिषदेतील २१ पदांच्या ऑनलाईन भरतीसाठी अर्ज भरण्याचा कालावधी दि.२६/०३/२०१९ ते १६/०४/२०१९ असा आहे. सदय:स्थितीत अनेक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरणे शिल्लक असल्याचे ग्राम विकास विभागाच्या निदर्शनास आलेले आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख वाढवून मिळण्याबाबत उमेदवारांकडून विविध माध्यमातून विनंती करण्यात येत आहे. ही बाब विचारात घेवून, उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणेकरीता दिनांक २३/०४/२०१९ (११:५९ p.m.) पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच सदरची मुदतवाढ ही अंतिम असून, यापूढे कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच उमेदवाराने लवकरात लवकर अर्ज भरण्याची कार्यवाही करावी आणि कोणत्याही कारणासाठी शेवटच्या तारखेपर्यंत थांबू नये असे सर्व उमेदवारांना आवाहान करणेत येत आहे. तसेच जाहिरातीस ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी देण्यात येणारी ही मुदतवाढ अंतिम असून, यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व संभाव्य उमेदवारांनी नोंद घ्यावी, ही विनंती. तसेच सदर बदला व्यतिरिक्त दिलेल्या जाहिरातीमध्ये इतर कोणताही बदल नाही याचीही सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदरचे पत्र महाआयटी कक्षाने त्यांच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी व सुविधेसाठी तात्काळ प्रसिध्द करावे, ही विनंती.

आपला

(गिरीश भालेराव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:

निवडनस्ती (आस्था ८).